दाखल तारीख – ०३/०३/२०२३
नोंदणी तारीख – ०३/०३/२०२३
निकाल तारीख – ०२/०५/२०२३
कार्यकाळ – ०० वर्ष. ०१ म.२९ दि.

# दिवाणी न्यायाधीश क.स्तर कारंजा (लाड) यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी एम. एच. हक)

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५२/२०२३

**निशाणी क्र. १८**

१. **प्रेमा श्रीराम सेंधवकर** **.... अर्जदार**
वय– ८५ वर्ष, धंदा– निरंक
रा. नागनाथ मंदीराजवळ वाणीपुरा कारंजा
ता. कारंजा जि. वाशिम.

२. **ज्योती दिपक सेंधवकर**
वय– ५२ वर्ष, धंदा– गृहिणी

३. **शुभम दिपक सेंधवकर**
वय– २५ वर्ष, धंदा– शिक्षण

४. **प्रतिक्षा दिपक सेंधवकर**
वय– २५ वर्ष, धंदा– शिक्षण
अर्जदार क्र.२ ते ४ रा.बायपास वनदेवी नगर कारंजा
ता. कारंजा जि. वाशिम.

**– विरूध्द –**

**कोणीही नाही** **.... गैरअर्जदार**

दावा– **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज.**

अर्जदारातर्फे वकील **श्री. पी.के. सावळे**
सामनेवालातर्फे कोणी नाही.

# न्यायनिर्णय

(दिनांक **०२/०५/२०२३** रोजी पारित)

१. प्रस्तुत अर्ज मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांचा वारस दाखला मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे कथन खालीलप्रमाणे –**

अर्जदार क्र.१ हिचा मुलगा, अर्जदार क्र.२ हिचे पती व अर्जदार क्र.३ व ४ यांचे वडील मयत नामे दिपक श्रीराम सेंधवकर हे दिनांक १८/११/२०२२ रोजी कारंजा येथे मयत झाले आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतीरिक्त दिपक श्रीराम सेंधवकर यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे कथन आहे की, मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांच्या मृत्यु नंतर अर्जदारांना शासकिय व निम–शासकिय कामासाठी व कागदोपत्री पूर्ततेसाठी त्यांना मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला हवा आहे. सबब, अर्जदार यांनी मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

४. निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत करुन दिनांक २१/०३/२०२३ रोजीच्या 'पुण्यनगरी' निशाणी क्र.१६ या वर्तमान पत्रातुन जाहीर प्रगटन देवून तसेच जाहीरनाम्याद्वारे हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु अद्यापपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

५. अर्जदारांच्या कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झालेली आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसे सह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारांनी मागणी केलेल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहे काय? | **होकारार्थी** |
| २. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ बाबत –</u>**

**६.** सदर अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार ज्योती दिपक सेंधवकर हिने तिचे शपथपत्र निशाणी क्रमांक ०९ वर दाखल आहे. मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत निशाणी क्रमांक १० वर, मयत दिपक यांच्या आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत नि.क्र.११, अर्जदार क्र.१ हिची इलेक्शन कार्डची व्हेरीफाईड प्रत नि.क्र.१२, अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या आधारकार्डच्या व्हेरीफाईड प्रती नि.क्र.१३ ते १५ व 'दैनिक सायरन' या वर्तमान पत्राची प्रत निशाणी १६ वर असे दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

**७.** जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत अर्जामध्ये कोणीही हजर झाले नाही, अगर आपली हरकत नोंदविलेली नाही. अर्जदार यांच्या वतीने त्यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

**८.** अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन निदर्शनास येते की, अर्जदार हेच मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांचे कायदेशीर वारस आहेत व अर्जदार यांचे व्यतिरीक्त त्यांना इतर कोणीही वारस आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदाराने दिलेला पुरावा हा अटळ व अबाधीत राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे मयत दिपक श्रीराम सेंधवकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE
Date: 2023.05.03 13:31:22 +0530

दिनांकः ०२–०५–२०२३

(एम.एच. हक)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
कारंजा (लाड)